

पुणे लोहमार्ग विभागातील विविध पोलिस ठाण्यांतर्गत जप्त केलेले १ हजार किलोचे अमली पदार्थ नष्ट करण्यात आले.

# लोहमार्ग पोलिसांनी जप्त केलेले १ हजार किलोचे अमली पदार्थ नष्ट

पृ-३ दि. १५/६/२०२३

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे लोहमार्ग विभागातील विविध पोलिस ठाण्यांतर्गत जप्त केलेले १ हजार किलोचे अमली पदार्थ नष्ट करण्यात आले. १९९२ ते १४ जूनपर्यंत लोहमार्ग पोलिसांच्या पुणे, दौंड, कुर्डूवाडी आणि सोलापूर या पोलिस ठाण्यांनी ४७ केसेसमध्ये १ हजार ५०० किलो वजनाचे अमली पदार्थ जप्त केले होते. त्यापैकी २१ गुन्ह्यांतील केसेसमध्ये जप्त केलेले अमली पदार्थ नष्ट करण्यात आले. यामध्ये गांजा, चरस असा ६ कोटी २५ लाखांचा मुद्देमाल जाळून नष्ट करण्यात आला.

शहरात विविध चोरट्या मार्गांनी अमली पदार्थांची वाहतूक केली जाते. अशा विविध कारवायांमधून शहरात पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त केले होते. तसेच दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. हा जप्त केलेला अमली पदार्थांचा साठा नष्ट करण्यात आला आहे.

यावेळी अमली पदार्थ रासायनिक विश्लेषण अधिकारी, महाराष्ट्र राज्य प्रदूषण महामंडळाचे अधिकारी, शासकीय वजन व मापन अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांसह पुणे लोहमार्ग जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक तसेच अमली पदार्थ नाश समितीचे अध्यक्ष श्रीकांत धिवरे, उपअधीक्षक चंद्रकांत भोसले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक इरफान शेख यांची उपस्थिती होती. या समितीने पंचनामा करून, वजन करून अमली पदार्थ जाळून टाकले.

Scanned with CamScanner